आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -रात्री   ८.०५ वाजता

९ नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीसाठीचा प्रचार शिगेला

- महाराष्ट्रातल्या मतदारांनी दूरदृष्टी दाखवून भाजपाला सलग १० वर्षं सर्वाधिक पसंती दिली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- भाजपाचं नेतृत्व केवळ बड्या भांडवलदारांच्या हिताचा विचार करत असल्याचा काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा झारखंडमधल्या प्रचारसभेत आरोप

- सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या अधिकृतपणे निवृत्त होणार, न्यायमूर्ती संजीव खन्ना स्वीकारणार पदभार

**आणि**

- देशातल्या ७ शैक्षणिक संस्थांना क्वाकरेली सिमोंड्स जागतिक मानांकनात आशिया विभागात पहिल्या १०० मधे स्थान, आयआयटी मुंबईचा ४८वा क्रमांक

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांसाठीच्या प्रचारानं कमालीचा वेग घेतला आहे. विविध राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा आणि पत्रकार परिषद आज राज्यभरात झाल्या. वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या आणि इतर समाजमाध्यम व्यासपीठांवर आपापली भूमिका मांडून उमेदवार आणि त्यांच्या पक्षांचे प्रचारक मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत.

**<><><><><>**

देशाच्या विकासाकरता भाजपा आणि मित्रपक्षच गांभीर्यानं काम करत असल्याची महाराष्ट्रातल्या जनतेला खात्री असल्यानेच गेली दहा वर्षं सर्वाधिक मतं

भाजपाच्या पारड्यात पडत आहेत, असं भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी निवडणूक प्रचारसभेत सांगितलं. महाराष्ट्रात नांदेड इथं विधानसभा निवडणूकीतल्या आणि लोकसभा पोटनिवडणुकीतल्या उमेदवाराच्या प्रचारसभेत आज ते बोलत होते. गेल्या १० वर्षांत सिंचनासाठी राबवलेल्या योजनांचा उल्लेख त्यांनी केला. सव्वा कोटीपेक्षा जास्त शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान निधी दिला, सोयाबीन शेतकऱ्यांना आर्थिक मदत सरकारनं केली, असं ते म्हणाले. महायुती सरकारने महिलांसाठी राबवलेल्या योजनांचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी यावेळी केला.

**होल्ड बाईट मोदी**

**अकोला** इथंही आज प्रधानमंत्री मोदी यांनी प्रचारसभा घेतली. केंद्र सरकारनं मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव केला आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. राज्यात टेक्सटाइल पार्कच्या उभारणीमुळे कापूस शेतकऱ्यांसाठी नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

भाजपाचं नेतृत्व केवळ बड्या भांडवलदारांच्या हिताचा विचार करत असल्याचा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी केला. झारखंडमधल्या धनबाद जिल्ह्यातल्या प्रचारसभेत ते आज बोलत होते. देशात अनुसूचीत जाती, जमाती, इतर मागासवर्गीयांची लोकसंख्या सर्वात जास्त असूनही त्यांना सरकारी संस्थांमध्ये पुरेसं प्रतिनिधित्व मिळत नाही असंही गांधी म्हणाले. तर छत्तरपूर इथं झालेल्या सभेत भाजपा नेते अमित शहा यांनी राहुल गांधी हे ओबीसी, दलित, आदिवासींच्या विरोधात असल्याची टीका केली. झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते, मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांवर टीका केली. तर राजद आणि डाव्या पक्षांच्या नेत्यांनीही झारखंडच्या विविध भागात प्रचारसभांना संबोधित केलं. झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यासाठी १३ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.

<><><><><>

काँग्रेसनं कायमच लोकशाही आणि संविधान यांचं रक्षण आणि संवर्धन केलं आहे, असं काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी महाराष्ट्रात अमरावती इथं प्रचारसभेत सांगितलं. नरेंद्र मोदी यांनी खोटी आश्वासनं दिली, शेतकऱ्यांना हमीभाव, महिलांना सुरक्षितता, तरुणांना रोजगार काहीही मिळालं नाही, असा आरोप खर्गे यांनी केला. महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर शेतकरी, महिला, युवा यांच्यासाठी कल्याणकारी योजना आणू, असं आश्वासन खर्गे यांनी दिलं.
त्याआधी मल्लिकार्जुन खर्गे यांनी नागपूर इथं वार्ताहरांशी संवाद साधला. न्याय, कायदा आणि सुव्यवस्थेसाठी ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची प्रशासन व्यवस्था महायुुतीचं सरकार आल्यानंतर कोलमडली आहे, अशी टीका त्यांनी यावेळी केली. महाराष्ट्राला पुन्हा एकदा प्रगतीपथावर आणण्यासाठी ही निवडणूक महत्वाची असल्याचं खर्गे म्हणाले.

<><><><><>

काँग्रेसशासित हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सुख्खु, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी तसंच कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी आज मुंबई इथं पत्रकार परिषद घेऊन भाजपा खोट्या जाहिराती करून लोकांची दिशाभूल करत असल्याचं सांगितलं. तेलंगणा, कर्नाटक आणि हिमाचल प्रदेशात काँग्रेसनं दिलेली आश्वासनं पूर्ण केली असून लोककल्याणकारी योजना राबवल्या आहेत, असं काँग्रेस नेत्यांनी सांगितलं. तिन्ही राज्यात राबवल्या जाणाऱ्या योजनांची माहिती यावेळी त्यांनी दिली.

<><><><><>

महाराष्ट्रात यावेळी निवडणूक लढवणाऱ्या पक्षांची आणि उमेदवारांची संख्या जास्त असून त्यामुळे उमेदवारांचा कस लागणार असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस

शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. आज एका वृत्तवाहिनीला ते मुलाखत देत होते. शरद पवार यांनी हिंगोली इथं तसंच बीडमध्ये परळी आणि आष्टी इथल्या सभांनाही संबोधित केलं.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या गडचिरोली आणि चंद्रपूर  जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

शिक्षणात गुंतवणूक हा समाजसेवेचा सर्वात प्रभावी मार्ग आहे कारण यामुळे मनुष्यबळ समृद्ध होऊन वर्तमान आणि भविष्य दोन्ही सुरक्षित राहतं असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड म्हणाले. ते आज राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या चौथ्या दीक्षांत समारंभात बोलत होते. शिक्षणाकडे व्यापार म्हणून पाहू नये तर शिक्षणासाठी योगदान देणं आपलं कर्तव्य असल्याचं त्यांनी सांगितलं. जगात अनेक अग्रगण्य शिक्षणसंस्था त्यांच्या माजी विद्यार्थ्यांच्या शाश्वत पाठिंब्यावर आणि उत्साहाच्या बळावर भरभराट करताना दिसत आहेत, असं त्यांनी म्हटलं.

**<><><><><>**

सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या रविवारी अधिकृतपणे निवृत्त होणार आहेत. त्यानंतर न्यायमूर्ती संजीव खन्ना देशाचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. अनेक ऐतिहासिक निर्णयांसाठी प्रसिद्ध असलेल्या न्यायमूर्ती चंद्रचूड यांचा काल न्यायालयात शेवटचा दिवस होता. न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या निकालांमध्ये अयोध्या जमीन वाद, दोन प्रौढांनी

सहमतीने ठेवलेल्या समलिंगी संबंधांना मान्यता आणि अविवाहित महिलांना गर्भपाताचा अधिकार यांचा समावेश आहे. त्यांचे हे निर्णय समाज आणि राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे होते. चंद्रचूड यांनी ११ नोव्हेंबर २०२२रोजी सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला होता.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उत्तराखंडच्या २५व्या स्थापनादिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. उत्तराखंड राज्यानं विविध क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करुन विकासाची नवी उंची गाठली आहे, असं त्यांनी यानिमित्त आयोजित कार्यक्रमात दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून बोलताना सांगितलं. केंद्र सरकार उत्तराखंडच्या प्रगतीसाठी वचनबद्ध असून आगामी २५ वर्षात राज्यानं विकसित भारतासाठी विकसित उत्तराखंड हे ध्येय समोर ठेवून कार्य करावं, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

देशातल्या ७ शैक्षणिक संस्थांना क्वाकरेली सिमोंड्स जागतिक मानांकनात आशिया विभागात पहिल्या १०० मधे स्थान मिळालं आहे. त्यात आयआयटी मुंबईला ४८वा क्रमांक मिळाला आहे. आयआयटी दिल्लीला ४४ वा क्रमांक मिळाला असून आयआयटी मद्रास, आयआयटी खरगपूर, आयआयटी कानपूर, भारतीय विज्ञान संस्था, दिल्ली विद्यापीठ यांचा समावेश पहिल्या १०० मानांकनात आहे. त्यानंतरच्या ५० मानांकनांमधे आयआयटी गुवाहाटी, आयआयटी रूरकी, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, चंडीगढ विद्यापीठ, इत्यादींचा समावेश आहे. आशियातल्या २५ देशांमधल्या ९८४ शैक्षणिक संस्थांचं मूल्यमापन करुन ही यादी बनवण्यात आली आहे.

**//<><><><><>//**